# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
## राष्ट्रीय सेवा योजना
# वार्षिक अहवाल
## २०१५-१६

शैक्षणिक सत्र २०१५–१६ च्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये सहभागी होऊ इच्छीणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची नामांकन प्रक्रीया पूर्ण करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कार्य करण्याची आवड निर्माण व्हावी. श्रमदानाची भावना जोपासावी, सेवाभाव निर्माण व्हावा, श्रमाची प्रतिष्ठा निर्माण व्हावी तसेच ग्रामीण जीवनाशी त्यांचा परिचय होऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजने बद्दलची माहिती अशा विविध पैलुंशी स्वयंसेवकांना परिचित करण्यात आले. विविध माध्यमाद्वारे त्यांना याबाबत प्रेरणा देण्यात आली.

**दि. २० ऑगष्ट २०१५ ते ५ सप्टेंबर २०१५**

या कालावधीत “सामाजिक समरसता सद्‌भावना पंधरवाडा” साजरा करण्यात आला. यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. प्राचार्य डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत, प्रभारी कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या शपथविधीच्या निमित्त्याने निबंध स्पर्धा, पर्यावरण संरक्षणावर आधारित पोष्टर स्पर्धा, रक्तगट चाचणी, सामान्यज्ञान स्पर्धा, सूदृढ आरोग्याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी या हेतुने पावसाळयातील विविध आजार या विषयावर डॉ. प्रणय गांधी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. वाहतुक नियम पाळा व अपघात टाळा” या शिर्षकाखाली प्रचार पत्रिका तयार करून त्यांचे विमोचन करण्यात आले. त्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये रस्त्यावरील अपघात व नियमाविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.

**दि. २४ सप्टेंबर ते २ आक्टोंबर २०१५**

राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना प्रसिद्धी सप्ताह (युवासप्ताह) आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाकरिता युवा

सप्ताहअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मा. शरद ठेंगरी यांनी आजच्या युवकांना आवश्यक ते मानसीक, भावनीक शिक्षणच नव्हे तर सुशिक्षीतपणा, सुसंस्कृतपणा, संस्कृती व जीवनाची मुल्ये कशी जपावित, संस्कारांचा उपयोग उपयुक्ततेने कसा करून घ्यावा. विचार, निती, प्रतिष्ठा, स्वच्छता प्रतिष्ठा कशी जपावी याबाबत अतिशय मार्मिक असे मार्गदर्शन केले. डॉ. योगेश दुधपचारे यांनी विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयाची आवड आणि जाणीव निर्माण करून देण्याचा अथक प्रयत्न केले. डॉ. विद्याधर बन्सोड युवकांचा “समाज जडणघडणीत असलेला सहभागआणि भूमिका” या विषयावर तर डॉ. एल. व्ही. शेंडे, डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या  व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

**दि. ०१ ऑक्टोंबर २०१५**

रक्तगट चाचणी शिबिर घेण्यात आले. दि. २/१०/२०१५ ला अहिंसा दिनामित्ताने श्रमदान आणि तसेच पत्रकार मुरली मनोहर व्यास यांचे अहिंसा दिनानिमित्त मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम आयोजीत करण्यात आला.

**दि. २६ नोव्हेंबर २०१५**

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने संविधान दिन आयोजित करण्यात आला. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला माल्यार्पन करून सामुहिकरित्या संविधान उद्देशिकाचे वाचन करण्यात आले. डॉ. बन्सोड, डॉ. इंगोले, जयश्री धांदे, डॉ. पोतनुरवार यांनी भारतासाठी सर्वश्रेष्ठ असणाऱ्या संविधान निर्मितीतील आंबेडकरांच्या कार्याबद्दल त्याचे आभार व्यक्त केले.

**दि. १५ डिसेंबर २०१५**

चंद्रपूर येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे आयोजित सार्वजनिक स्वच्छता सप्ताह आयोजीत करण्यात आला त्यांत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**<u>दि. २५ डिसेंबर २०१५</u>**

'सुशासन दिन' साजरा करण्यात आला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधुन डॉ. एल. व्ही. शेंडे यांनी विद्यार्थ्यांना सुशासन दिनाचे महत्व समजावून सांगितले.

**<u>दि. ०२ जानेवारी २०१६ ते ०८ जानेवारी २०१६</u>**

या कालावधीत "स्वच्छ गाव स्वच्छ भारत" या महाविद्यालयातील विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर दि. २ जानेवारी २०१६ शनिवार ला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व सर्व कार्यक्रम अधिकारी यांचे शिबिर स्थळी आगमन झाले.

**दि. ३ जानेवारी २०१६ रविवार** ला उद्घाटन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए. शेख, ग्राम पंचायत, विसापूर च्या सरपंच रिताताई जिलटे, उपसभापती पंचायत समिती, बल्लारपूर, मा. श्री. अनकेश्वर मेश्राम, अध्यक्ष म. गांधी तंटामुक्ती समिती, विसापूरचे मा. श्री. लक्ष्मणरावजी इटनकर उपस्थितहोते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. शरयु पोतनुरवार यांनी केले.

**दि. ०४ जानेवारी २०१६** ला डॉ. देवेंद्र भगत यांनी 'जीवनात उच्च शिक्षणाचे महत्व' या विषयावर उत्कृष्ठ व्याख्यान दिले. ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

**दि. ०५ जानेवारी २०१६** ला डॉ. शरयु पाझारे यांनी "आहार आणि आरोग्य" या विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच **श्रमदानातून वर्धा नदीवर मानीचा बंधारा बांधण्याचे काम करण्यात आले.**

**दि. ६ जानेवारी २०१६** ला रक्तगट चाचाणी शिबिराचे आयोजन करण्यात आले यात १००विद्यार्थ्यांचे रक्तगट चाचणी करण्यात आली. श्रीकांत साव यांनी 'स्पर्धा परिक्षेची तयारी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व बंधारा बांधण्याचे उर्वरीत काम पूर्ण करण्यात आले.

**दि. ७ जानेवारी २०१६** ला. डॉ. योगेश दुधपचारे यांनी ‘जलसाधन संपत्ती व तिचे संरक्षण’ या विषयावर अमुल्य मार्गदर्शन केले.

**दि. ८ जानेवारी २०१६** ला शिबिराचा समारोपीय कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन मा. शांतारामजी पोटदुखे, अध्यक्ष, सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर तथा माजी केंद्रिय अर्थराज्यमंत्री (भारत सरकार), मा. श्री. संजयबाबू देवतळे, माजी सांस्कृतिक व पर्यावरणमंत्री (म.रा.), आवर्जुन उपस्थित राहुन विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. शिबिर काळात आयोजीत उपक्रमात स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घ्यावा या उद्देशाने त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी ठेवलेल्या पारितोषिकाचे वितरण करण्यात आले.

**१५ जानेवारी २०१६ ते ३१ जानेवारी २०१६** या पंधरवाडया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना पथकातील विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षा अभियान, भारत सरकार अंतर्गत शालाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्व्हेक्षण केले व त्यावरून अहवाल तयार करून सादर करण्यात आला.

**१८ जानेवारी २०१६ ते २३ जानेवारी २०१६**

राष्ट्रीय सेवा योजना पथकाने महाविद्यालयामध्ये आयोजीत क्रिडा व सांस्कृतीक महोत्सव २०१५–१६ यामध्ये महत्वाची भूमीका पार पाडली.

**४ मार्च २०१६** ला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यता आले. त्यात ३० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

**८ मार्च २०१६**

जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून जगातील महिला दिन समारोह समिती व महिला स्वयंसिद्ध संस्था, चंद्रपूर तर्फे स्त्री सन्मान प्रेरणा रॅलीचे आयोजन गिरनार चौक ते जिल्हाधिकारी कायालयापर्यंत करण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथक सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे रॅलीमध्ये सहभागी झाल्या.

युवा सप्ताह, सद्भावना समरसता पंधरवाडा विशेष शिबिर व विविध आयोजित कार्यक्रम हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए. शेख आणि उपप्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडले. या कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. कुलदीप गोंड, कार्यक्रम अधिकारी प्रा. उषा खंडाळे, प्रा. राजकुमार बिरादार, प्रा. डॉ. शरयु पोतनुरवार यांनी व राष्ट्रीय सेवायोजनातील विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

(प्रा. के. आर. गोंड)
कार्यक्रम अधिकारी

(डॉ. आर. पी. इंगोले)
प्रभारी प्राचार्य

## Department of National Service Scheme
## Represented University Camp & College Camp Best Students
## 2015-2016



Mr. Lakhan Jagwani
AVHAN Camp



Mr. Rahul Takdhat
AVHAN Camp



Ku. Vijaya Kawane
AVHAN Camp



Ku. Heena Nikhat
AVHAN Camp



Ku.Karishma Yengalwar
University Best Camper



Ku. Pragati Katare
University Camp



Ku. Payal Khandekar
Best Volunteer



Ku. Priyanka Sontakke
Best Anchor



Ku.Tarannum Sheikh
Best Volunteer

## Department of National Service Scheme
## Represented University Camp & College Camp Best Students
## 2015-2016



Mr. Sumit Sawsakade
Best Volunteer



Mr. Ankush Kuntawar
Best Volunteer



Mr. Amit Kallo
Best Volunteer



Mr. Rohit Khobragade
Best Dancer



Mr. Vaishishit Potraje
Best Acting



Mr. Keul Ramgirwar
Best Volunteer



Mr. Ravindra Nikhare
Best Volunteer



Mr. Amol Kamble
Best Volunteer



Mr. Sameer Dekondwar
Best Volunteer



राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विशेष शिबीरच्या उद्‌घाटन समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए. शेख



राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विशेष शिबीरच्या समारोपीय कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शांतारामजी पोटदुखे




राष्ट्रीय सेवा योजना युवा सप्ताहच्या समारोपीय कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना

संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शांतारामजी पोटदुखे




राष्ट्रीय सेवा योजना सुशासन दिन पर मार्गदर्शन करतांना

महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य डॉ. एल. व्ही. शेंडे




सार्वजनीक स्वच्छता सप्ताह रॅलीत महाविद्यालयाचे रा. से. यो. चे विद्यार्थीगण




गांधी जयंती दिवसाच्या औचित्याने महाविद्यालयाचा
परिसर स्वच्छ करतांना रा. से. यो. चे विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना दिवस पर मार्गदर्शन करतांना मा. श्री शरद ठेंगरी



युवा सप्ताह पर मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विद्याधर बन्सोड




संविधान दिवस पर मार्गदर्शन करतांना महाविद्यानलयाचे
उपप्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले




सद्भावना दिवसाच्या निमित्याने शपथ देतांना राजिव गांधी अभियांत्रीकी
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कीर्तीवर्धन दिक्षित




भव्य रक्तदान शिबिराच्या प्रसंगी मार्गदर्शन करतांना
संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शांतारामजी पोटदुखे




रक्तदान करतांना राष्ट्रीय सेवा योजनचे विद्यार्थी सोबत
रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी



ग्रामपंचायत विसापूर येथे गावाची स्वच्छता करतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



ग्रामपंचायत विसापूर येथे गावाची स्वच्छता करतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी सोबत शिबिरार्थी




ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी



ग्रामपंचायत विसापूर येथे वर्धा नदिवर बंधारा बांधतांना
महाविद्यालयाचे रा. से. यो. चे शिबिरार्थी